
**ARTHA**
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३६ | पुणे, बुधवार, १६ सप्टेंबर, १९७० | अंक १८

छोट्या माणसाची सतत सेवा हीच आमची अभिमानास्पद परंपरा!



आपल्या छोट्याछोट्या उद्योगातून जे
राष्ट्रीय संपत्ती निर्माण करतात अशा
महत्वाच्या थोर व्यक्तींपैकी तुम्ही एक आहात का ?



३५०० हून अधिक छोटया-उद्योगांना
आमचे अर्थिक सहाय्य लाभले आहे.
सुमारे २० कोटींच्या घरात.

संपन्नतेची वाटचाल करणाऱ्या या
समूहात तुम्ही का सहभागी होत नाही ?
अधिकाधिक संपन्न होण्यासाठी !
तपशीलासाठी आजच चौकशी करा:

बँक ऑफ महाराष्ट्र

हेड ऑफिस: ११७७ बुधवार पेठ, पुणे २.

20169

# सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

फोन नं. :- ३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार—सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



# महाराष्ट्रातील नामवंत बँक

शेड्यूल्ड बँक ] [ स्थापना - १९३६

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

सातारा

रजिस्टर्ड ऑफिस : १४३-१४६, भवानी पेठ, सातारा शहर.

आपल्या ४३ शाखांनिशी आपल्या सर्व प्रकारच्या बँकिंगच्या सेवा आणि सुविधा उपलब्ध करून देण्यात तत्पर.

खेळते भांडवल : १२ कोटींचे वर

ठेवी : ११·७५ कोटींचे वर

ठेवींचे आकर्षक व्याजाचे दर.
तऱ्हेतऱ्हेच्या उद्योगधंद्यांस साहाय्य.
कोणत्याही शाखेस भेटा अगर लिहा.

वि. श्री. दामले

बी. ए., एम्. कॉम्., एल्एल् बी,
सी. ए. आय्आय्. बी. चेअरमन





किर्लोस्कर®

डिझेल एंजिन
सुविख्यात आहे ते ह्यामुळेच
■ गुणवत्ता ■ टिकाऊपणा
■ विश्वसनीयता आणि
■ शेतकऱ्याची समृद्धि

उत्कृष्ट डिझेल एंजिनाचे निर्माते
किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड, पुणे-३ (भारत)

® एंजिनसाठी किर्लोस्कर ऑईल एंजिन्स् लिमिटेड यांनी या ट्रेडमार्कच्या उपयोगाचा अधिकार नोंदविलेला आहे.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, १६ सप्टेंबर, १९७०



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.


## भारताला मदत नको असेल तर बंद करू

अमेरिकेचे भारतामधील वकील मि. केनेथ कीटिंग ह्यांनी मद्रास येथील पत्रकारांच्या परिषदेत बोलताना अमेरिकेच्या मदतीबद्दल भारतामधील काही बड्या सरकारी अधिकाऱ्यांनी व्यक्त केलेल्या मतांबद्दल नाराजी दर्शविली आहे. ते म्हणाले की भारताला मदत नको असेल तर ती बंद करण्याची अमेरिकेची तयारी आहे. भारताने अमेरिकेची मदत घेऊ नये असा अभिप्राय कांही वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांनी बऱ्याच वेळा व्यक्त केला आहे. हा अभिप्राय सरकारी धोरणाचा निदर्शक असेल तर अमेरिकेला भारतावर मदत लादण्याची इच्छा नाही हे स्पष्ट केले पाहिजे. १९६९ मध्ये अमेरिकेने विकासकार्यासाठी २०.३ कोटी डॉलर्सची रक्कम दिली. त्याशिवाय पब्लिक लॉ ४८० खाली ३१.६ कोटी डॉलर्स देण्यात आले. एकूण मदत ५१.९ कोटी डॉलर्स देण्यात आली. १९७० मध्ये एकूण मदत ५५.१ कोटी डॉलर्स देण्यात आली. त्यांपैकी २२.४ कोटी डॉलर्स विकासाच्या कामासाठी देण्यात आली. १९७१ सालात मदत देण्यासाठी प्रे. निक्सन ह्यांच्या सरकारने २७.७ कोटी डॉलर्सची मागणी केली आहे. पण कॉंग्रेसकडून ती कमी करण्यात येण्याची शक्यता आहे. भारतामधील सार्वजनिक मालकीच्या विभागातील उद्योगधंद्यांना फारशी मदत मिळालेली नाही असे सांगण्यात येते. ह्या बाबतचे आकडे असे आहेत. गेल्या १२ वर्षांत भांडवली खर्चासाठी अमेरिकेने भारताला ८१.६ कोटी डॉलर्स दिलेले आहेत. त्यांपैकी ६४.७ कोटी डॉलर्स इतकी रक्कम सार्वजनिक मालकीच्या विभागाला आणि १६.९ कोटी डॉलर्स खाजगी मालकीच्या विभागाला देण्यात आले आहेत. भारताला अमेरिकेने आजपर्यंत इतर कोठल्याही देशापेक्षा अधिक मदत दिलेली आहे.

---

## तयार कपड्यांच्या निर्यातीने परदेशी हुंडणावळ

औद्योगिक युगाचे एक लक्षण म्हणून तयार कपडे विकण्याच्या धंद्याचा उल्लेख करावा लागेल. हिंदुस्थानात कित्येक वर्षांपूर्वीच ह्या धंद्याला थोड्याबहुत प्रमाणात सुरवात झाली असली तरी युद्धोत्तर काळातच त्याची झपाट्याने वाढ झालेली दिसते. औद्योगिक शहरांतून शिंप्यांकडे जाऊन मापाप्रमाणे कपडे शिवून घेणे वेळेच्या अभावी अशक्य होत जाते. अमेरिकेत तर अशा रीतीने कपडे शिवून घेणे श्रीमंतांनाच काय ते परवडते. भारतातही ह्या तयार कपड्याच्या धंद्याने आता चांगले मूळ धरले आहे. शिवाय मोठ्या प्रमाणावर कपडे तयार करण्याने कापडात बचतही होते. ह्या धंद्याला ह्यापुढेही भरभराट प्राप्त होण्याची लक्षणे दिसत आहेत. तथापि केवळ अंतर्गत बाजारपेठेतच त्याला वाव आहे असे नाही. तयार कपडे परदेशी पाठवून भारत परदेशी चलनाचे उत्पन्न मिळवीत आहे. १९६७ साली तयार कपडे परदेशी पाठवून ३.२५ कोटी रुपयांचे परदेशीय चलन मिळाले आहे. ह्या निर्यातीत वाढ होत चालली असून ह्या वर्षी निर्यातीपोटी ८ कोटी रुपयांचे परदेशीय चलन मिळेल अशी अपेक्षा आहे. भारतात तयार झालेले अनेक प्रकारचे कपडे परदेशात लोकप्रिय होत आहेत. त्यात मुख्यतः शर्ट आणि विजारी ह्यांचा समावेश आहे. हे कपडे रशिआ आणि पश्चिम आशियातील देश ह्यांतून लोकांच्या पसंतीस उतरले आहेत. पण त्याशिवाय ब्रिटन, अमेरिका, पश्चिम जर्मनी इत्यादी देशांतूनही ते गिऱ्हाइकांना आकृष्ट करीत आहेत. परदेशातील बाजारपेठांचा अभ्यास करून तेथील गिऱ्हाइकांच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन तयार कपडे पाठविल्यास निर्यातीची खूपच वाढ होण्याची शक्यता आहे. अर्थात त्यांची आकर्षकता व दर्जा चांगला असला पाहिजे.

---

## संचालकांची कंपन्यांसाठी घेतलेल्या कर्जास हमी

"मॅनेजिंग एजन्सीची जागा आता तंत्रकुशल लोक घेऊ लागले आहेत आणि कर्जाच्या अर्जाची छाननी करण्याचे आर्थिक दृष्टिकोन आणि तंत्रही सुधारले आहे; तेव्हा कर्ज मंजूर करतेवेळी कर्ज मागणाऱ्या कंपन्यांकडून त्यांचे संचालक आणि व्यवस्थापक ह्यांची सर्वच प्रकरणात व्यक्तिशः हमी घेण्याची आवश्यकता आता पूर्वीप्रमाणे उरलेली नाही. अगदी आवश्यक त्याच कर्जाचे बाबतीत अशी गॅरंटी घेण्यात यावी. अशा संबंधात संचालक आणि व्यवस्थापक कर्ज घेणाऱ्या कंपन्यांकडून गॅरंटी राहण्यासाठी कमिशन, ब्रोकरेज, फी इत्यादी कोणत्याही स्वरूपात पैसे घेत नाहीत ना,-हे बँकांनी काळजीपूर्वक पाहावे." अशा अर्थाचे सर्क्युलर रिझर्व्ह बँकेने सर्व शेड्यूल्ड व्यापारी बँकांना आणि मुदती कर्जे देणाऱ्या संस्थांना पाठविले आहे. कोणत्या कर्जासाठी गॅरंटी घ्यावी आणि कोणत्या कर्जासाठी गॅरंटीची आवश्कता नाही, ह्याच्या मार्गदर्शनपर सूचनाही रिझर्व्ह बँकेने केल्या आहेत.

---

## वाढती महागाई : तिची कारणे व उपाय

### ग्रामीण भागात बचतवाढ आणि करवाढ आवश्यक

गेल्या दहा वर्षांत, किमती दरसाल १०% ह्या गतीने वाढत गेल्या आहेत. महागाई वाढत चालली, म्हणजे योजनेचे अंदाजही चुकत जातात; किमती वाढल्या म्हणून मजुरीचे दर वाढतात आणि त्यामुळे महागाईत पुनः भर पडते.

किंमतवाढीची तीन प्रमुख आर्थिक कारणे आहेत (१) चलनाच्या पुरवठ्यात वाढ, (२) लोकसंख्येत वाढ आणि (३) उत्पन्नात फेरफार.

१९६०-६१ मध्ये जनतेला २८,६८.६१ कोटी रुपयांचे चलन उपलब्ध होते. १९६५-६६ मध्ये त्याची रक्कम ४५,२९.३९ कोटी रु. झाली, १९६८-६९ मध्ये ती ५७,७९.२५ कोटी रु. झाली आणि १९६९-७० मध्ये ती ६३,५३.६५ कोटी रु. वर गेली.

तुटीची अर्थव्यवस्था आणि सरकारी खर्चात वाढ, ह्यानेही उपलब्ध चलनात भर पडते. हे सर्व पैसे महागाई होऊ न देता पचविण्याचे सामर्थ्य हिंदी आर्थिक संसाराला नाही. त्यातच काळ्या पैशाची भर पडून किमती वर जातात.

लोकसंख्या दरसाल २.५% ने वाढत आहे. नव्या नव्या उत्पन्नदारांमुळेही मागणी वाढून किमती कडाडतात.

हरितक्रांतीमुळे जनतेजवळ जास्त क्रयसाधन झाले आहे, असे सरकारचे म्हणणे आहे. ही क्रयशक्ती कमी करण्यासाठी ग्रामीण भागातील बँकांकडील ठेवी वाढविल्या पाहिजेत आणि शेतीच्या उत्पन्नावर कर बसविला पाहिजे, हे ओघानेच आले. असे केले म्हणजे काळाबाजारवाल्यांचे पैसा मुरविण्याचे साधनही नाहीसे होईल.

खालील तक्त्यात गेल्या दहा वर्षांतील वाढती महागाई दिग्दर्शित केली आहे. १९६१–६२ मध्ये किंमत १०० होती असे गृहीत धरून त्या मानाने भाववाढीचे प्रमाण त्यात दाखविलेले आहे.

**घाऊक मालाच्या किमतींचे निर्देशांक**

| | सर्व जिनसा | अन्न पदार्थ | धान्य | औद्योगिक कच्चा माल | औद्योगिक पक्का माल |
|---|---|---|---|---|---|
| १९६१–६२ | १००.० | १००.० | १००.० | १००.० | १००.० |
| १९६५–६६ | १११.६ | १४४.६ | १५४.३ | १३३.८ | ११६.५ |
| १९६६–६७ | १४९.९ | १७१.१ | १८२.९ | १५८.४ | १२४.४ |
| १९६७–६८ | १६५.३ | २०७.८ | २२८.४ | १५६.४ | १२७.३ |
| १९६८–६९ | १६५.४ | १९६.९ | २०१.० | १५७.३ | १३१.८ |
| १९६९–७० | १७१.५ | १९६.५ | २०७.३ | १८०.१ | १३९.५ |

**६० देशांत हिंदी डिझेल इंजिने** — भारतात तयार झालेली डिझेल इंजिने ६० देशांत काम देत आहेत.

## हिंदमधील मुसलमानांच्या राजकारणाची चिकित्सा

अमेरिकेत राज्यशास्त्र शिकविणारे एक मुसलमान प्राध्यापक श्री. इम्तिआझ अहमद ह्यांचे दिल्ली येथे इंडिआ इंटरनॅशनल सेंटरच्या विद्यमाने व्याख्यान झाले. व्याख्यानाचा विषय 'हिंदुस्थातील मुसलमानांचे राजकारण' असा होता. व्याख्याते आपल्या भाषणात म्हणाले की भारतामधील मुसलमानांनी आपल्या राजकरणाचे विकेंद्रीकरण केले पाहिजे. धर्माच्या पायावर अखिल भारतीय स्वरूपाचे राजकरण करण्याचा दृष्टिकोन मुळातच चूक आहे. हिंदी मुसलमानांचे आपला एक-संघपणा टिकविण्याचे प्रयत्न फोल आहेत. त्यापेक्षा मुसलमानांच्या संघटनांनी स्थानिक व विभागीय समाजाशी संबंध जोडून इतर जातींशी मिळून–मिसळून वागून आपले प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न करावे. त्यांनी अखिल भारतीय मुसलमानांची एकत्र संघटना बनविण्याचे सोडून द्यावे. कारण सर्व भारतातील मुसलमानांना सारखेच लागू असणारे प्रश्न राहिलेले नाहीत म्हणून अखिल भारतीय पातळीवर त्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. मुसलमानांचे पुढारी उर्दू भाषेचा प्रश्न एकसारखा पुढे करीत असतात. उर्दू भाषेचा हा प्रश्न कृत्रिम स्वरूपाचा आहे. कारण उत्तर भारतामधील काही भाग वगळता फारच थोडे मुसलमान उर्दू भाषेचा वापर करतात. उत्तर भारतात मुस्लीम लीगचे पुनरुत्थापन करण्यात येत आहे. त्यावर टीका करून व्याख्याते पुढे म्हणाले की मुसलमानांतर्फे अनेक प्रकारच्या सवलतींची मागणी करण्यात येत असते. पण, ज्या भाषेत ह्या मागण्या करण्यात येतात, त्यामुळे त्यांना जातीय रंग चढतो. नोकरीच्या व इतर क्षेत्रांत भारतामधील मुसलमानांचे प्रमाण जर घसरले असेल तर त्याची कारणे वेगळी आहेत. मुसलमानांना भेदभावाने वागविण्यात येते म्हणून तसे होत आहे, असे नाही. हिंदी मुसलमान आर्थिकदृष्ट्या मागासलेले आहेत हे खरे कारण आहे.

## विमानांच्या सोयीसाठी चर्चचा मनोरा कमी करणार

मद्रास शहरातील सेंट थॉमस चर्चच्या इमारतीवर ६८ फूट उंचीचा मनोरा आहे. ह्या मनोऱ्यावरूनच चढण्या-उतरण्यासाठी विमानांना उड्डाण करावे लागते. त्यामुळे अर्थातच विमानांना धोका पोचण्याचा संभव आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन मनोऱ्याची उंची १४ फुटांनी कमी करण्यात येणार आहे. वाईट हवेत विमानांना केवळ यांत्रिक साधनांचा वापर करून धावपट्टीवर उतरावे लागते. अशा वेळी विमानाचा मार्ग १०० टक्के सुरक्षित असणे अतिशय आवश्यक असते. चर्चमध्ये येणाऱ्या लोकांनी अडचण जाणून ह्या उपक्रमास पाठिंबा दिला आहे. मनोऱ्याच्या दुरुस्तीसाठी सरकार नुकसान-भरपाई देणार आहे. ह्या चर्चची इमारत १८२५ साली बांधलेली आहे.

## मुंबईच्या संकल्पित नव्या भागाबद्दल धोक्याचा इशारा

मुंबईच्या ट्रॉम्बेजवळील समुद्राच्या पलीकडे नवीन शहर वसविण्याचे घाटत आहे. ह्या प्रश्नाबद्दल बरेच वादंगही माजले आहेत. मुंबईच्या वाढीच्या ह्या योजनेविषयी मध्यवर्ती आरोग्य खात्याच्या एंजिनिअरिंग संशोधन विभागाचे उपसंचालक श्री. जे. एम्. दवे ह्यांनी धोक्याचा इशारा दिला आहे. ते म्हणतात की संकल्पित नव्या शहराची हवामानविषयक व भौगोलिक परिस्थिती लक्षात घेतली तर हे शहर म्हणजे दूषित होणाऱ्या हवेचा एक तंबूच ठरणार आहे. मुंबई शहरासंबंधी होणाऱ्या नव्या योजनेत ह्या विषयाचा विचारच करण्यात आलेला नाही. नवे शहर दोन बाजूंनी डोंगरांनी वेढलेले असेल आणि सध्या मुंबईला समुद्रावरून येणाऱ्या वाऱ्याचा जो लाभ होतो तो त्याला मिळणार नाही ट्रॉम्बेच्या बाबतीत झालेल्या चुकीची पुनरावृत्ती होऊ न देण्यासाठी आधीपासूनच कडक उपाय योजण्यात आले पाहिजेत. नव्या शहरातील कारखान्यांचा भाग राहण्याच्या भागापासून अगदी अलग ठेवण्यात आला पाहिजे. भारतात हवा शुद्ध राखण्याच्या दृष्टीने कोणत्याच प्रकारचे नियोजन आतापर्यंत करण्यात आलेले नाही. ह्या बाबतीत ट्रॉम्बे आणि दिल्ली ह्यांची उदाहरणे पाहण्यासारखी आहेत. ह्या दोन्ही ठिकाणी उद्योगधंद्यांची गर्दी करू देण्यात आली. परंतु कारखान्यांमुळे बाहेर पडणाऱ्या दूषित वायूचा शुद्ध हवेवर काय परिणाम होईल ह्याबद्दल काहीच अभ्यास अगर विचार करण्यात आला नाही. त्यामुळे वसती असलेल्या शहराच्या भागांना नाना प्रकारच्या घातक विषारी धुराची धुरी कायमची मिळत असते. ह्या धुराचा माणसांवर फार वाईट परिणाम होतो.

आरोग्यावर होणाऱ्या घातक परिणामांची वैद्यकीय पाहणी करण्यात आली तर भयचकित होण्याची पाळी आल्याशिवाय राहणार नाही. नव्या दिल्लीत राजघाट, विजयघाट ह्यांसारखी राष्ट्रीय स्मारके आहेत. त्यांच्या भोवती चांगल्या हिरवळी राखण्यात आल्या आहेत. परंतु ह्या स्मारकांच्या नजीक उष्णतेच्या साह्याने वीज उत्पन्न करणारे एक केंद्र आहे. ह्या विद्युत्‌निर्मितीच्या केंद्रातून रोज २० टन गंधकयुक्त धूर हवेत पसरला जातो. इंद्रप्रस्थ वसाहतीचीही अशीच स्थिती आहे. तेथे असणाऱ्या वीजनिर्मितीच्या केंद्रातूनही विषारी वायू एकसारखे बाहेरच्या हवेत ओकले जात असतात. भारतामधील नियोजन हे अशा प्रकारचे आहे. वास्तविक हवा खराब होण्याविरुद्ध काय उपाय करावेत ह्यासंबंधी पुष्कळ माहिती उपलब्ध आहे. पण त्याकडे दुर्लक्ष होत आहे. गंधकयुक्त विषारी धुराचा हवेत प्रमाणाबाहेर साठा झाल्यास फुफ्फुसांच्या व इतर अनेक तक्रारी उद्भवतात. येत्या ३०–४० वर्षांत भारतात अवजड उद्योगधंद्यांची वाढ खूप मोठ्या प्रमाणावर होणार आहे. तेव्हा उद्योगधंद्यांच्या केंद्रांतून हवा शुद्ध राखण्याचे काम बिकट होत जाणार आहे. ह्यासंबंधी वेळेवरच उपाय योजण्याची दक्षता घेण्यात आली नाही तर उद्योगप्रधान शहरांतील नागरी लोकांवर फार मोठा परिणाम होईल. उद्योगधंद्यात पुढारलेल्या थोड्या देशांनी ह्याबाबतीत कायदे केलेले आहेत. भारतातही असे कायदे अस्तित्वात आहेत. परंतु ते अतिशय नरम स्वरूपाचे आहेत आणि त्यांची अंमलबजावणीही योग्य रीतीने होत नाही. अशा कायद्यांचा भंग केल्यास दिल्या जाणाऱ्या शिक्षा इतक्या हास्यास्पद आहेत की कोणत्याही उद्योगपतीला कायदेशीर तरतुदीचा भंग करावयास काहीच दिक्कत वाटत नाही.

---

## हिंदू पती आणि ख्रिश्चन पत्नी ह्यांची संतती हिंदू अविभक्त कुटुंबाची घटक समजावी

श्रीधरन् हा एक ब्राह्मण अविभक्त हिंदू कुटुंबाचा घटक होता. श्रीधरन्‌ला बाप व भाऊ होते. त्या सर्वांनी कुटुंबाच्या इस्टेटीची वाटणी करून घेतली व ते विभक्त झाले. त्या वेळीं श्रीधरन् अविवाहित होता. वांटणी झाल्यानंतर श्रीधरन्‌ने एका ऑस्ट्रेलिअन मुलीशी लग्न केले. मुलीचे नांव रोजा मेरी होते. ते लग्न १९५४ च्या स्पेशल मॅरेज ॲक्ट अन्वये झाले होते. लग्नानंतर श्रीधरन्‌ला रोजा मेरीपासून एक मुलगा झाला. त्याचे नांव निकोलस असें ठेवण्यात आले. वाटणीअन्वये श्रीधरनला जी इस्टेट मिळाली होती, त्या इस्टेटीवर संपत्तीकर व प्राप्तीकर आकारण्यात आला. श्रीधरन् ही एक व्यक्ती आहे असे समजून तो कर आकारण्यात आला होता. ती गोष्ट श्रीधरन्‌ला मान्य नव्हती. त्याचे म्हणणें असे होते की, आपले कुटुंब हिंदू अविभक्त कुटुंब आहे व त्या कुटुंबाचे आपण व आपला मुलगा निकोलस हे दोघे घटक असल्यामुळे हिंदू अविभक्त कुटुंबावर ज्या दराने संपत्तीकर व प्राप्तिकर आकारण्यात येतो त्या दराने कर आकारण्यात यावा; व्यक्ती ह्या नात्याने कर आकारण्यात येऊ नये. अविभक्त हिंदू कुटुंबाच्या बाबतीत आकारण्यात येणारा कर व्यक्तीवर आकारण्यात येणाऱ्या कराहून कमी असतो. तेव्हा प्रश्न असा उपस्थित झाला की, हिंदूला ख्रिश्चन बायकोपासून झालेला मुलगा, त्याचे लग्न १९५४ च्या स्पेशल मॅरेज ॲक्ट अन्वये झाले असेल तर, अविभक्त हिंदू कुटुंबाचा घटक बनू शकतो काय ?

मद्रास हायकोर्टाने असें उत्तर दिले की, हिंदूचे ख्रिश्चन मुलीशी स्पेशल मॅरेज ॲक्ट अन्वये लग्न झाले असले तरी त्या लग्नापासून जी संतती उपजते ती औरस संतती समजली जाते. त्या औरस संततीचा बापाच्या अविभक्त हिंदू कुटुंबात समावेश होतो. बाप हा त्या अविभक्त हिंदू कुटुंबाचा प्रमुख समजला जाईल व त्याची औरस संतती त्या कुटुंबाची घटक समजली जाईल. म्हणजे असें की, हिंदू बापाला ख्रिश्चन बायकोपासून झालेली औरस संतति बापाच्या अविभक्त हिंदू कुटुंबाची घटक समजली जाते. ( १९७० ऑ. इं. रि. मद्रास २४९, श्रीधरन् वि. कमिशनर संपत्तीकर, मद्रास ) —न्यायबोध

## चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात एंजिनिअरांना नोकऱ्या

हिंदमधील बेकारीच्या प्रश्नाचे गांभीर्य आता सर्वांना कळून चुकले आहे. केवळ कारकुनी शिक्षणावर भर दिल्यामुळे बेकारी फोफावते असा समज २५-३० वर्षांपूर्वी पसरलेला होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तांत्रिक शिक्षणाचा प्रसार होऊनही बेकारी शिल्लकच राहिली, इतकेच नव्हे तर ती वाढतच चालली आहे. एंजिनिअर्स व ओव्हरसीअर्स ह्यांच्यासारख्या तंत्रज्ञानांही बेकारीला तोंड द्यावे लागत आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात रस्ते-बांधणीची अनेक कामे हाती घेण्यात येणार असून त्यामुळे १५,००० एंजिनिअरिंग तंत्रज्ञांना काम मिळेल अशी अपेक्षा करण्यात येत आहे. मध्यवर्ती सरकारने रस्ते-बांधणीच्या अनेक योजना मुक्रर केल्या आहेत. ह्या कामासाठी सुमारे ८,६०० एंजिनिअर्सना रोजगार मिळू शकेल. त्यांपैकी काही जणांना नव्या रस्त्यांची आखणी-पाहणी करण्यात व काहींना प्रत्यक्ष बांधकामात गुंतविता येईल. मध्यवर्ती सरकार आपल्या अखत्यारीतील रस्त्यांच्या कामासाठी ४१८ कोटी रुपये खर्च करणार आहे. चालू वर्षात रस्ते-बांधणीच्या कामावर ७२ कोटी रुपये खर्च करण्यात यावयाचे आहेत. कार्यक्रमाच्या अखेरच्या वर्षापर्यंत दरसाल खर्चाची रक्कम सुमारे ११४ कोटी रुपयांपर्यंत वाढत जाणार आहे. राज्य सरकारे पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अवधीत ४४८कोटी रुपये खर्च करणार आहेत. राज्य सरकारांच्या रस्तेबांधणीच्या कामात ६,४०० तंत्रज्ञांना काम मिळू शकेल. रस्ते-बांधणीच्या कामामुळे तंत्रज्ञांना काम मिळते ही एक बाजू झाली. वाहतुकीच्या सोयी वाढल्याशिवाय कोणतीही अर्थव्यवस्था विकास पावू शकत नाही. त्याही दृष्टीने रस्ते-बांधणीच्या कामाला महत्त्व आहेच.

---

## विषारी वायूची वासलात लावण्यास बंदी

कोरिआच्या युद्धात चिनी सैनिकांविरुद्ध वापरण्यासाठी तयार करण्यात आलेल्या विषारी वायूच्या अनेक पेट्या एका बोटीत ठेवून अमेरिकन लष्कराने सागरात बुडविल्या. परंतु बुडविण्यापूर्वी त्या निर्धोक करण्यात आलेल्या नव्हत्या. अमेरिकेच्या सिनेट सभागृहाने एक ठराव करून विषारी रासायनिक अगर जंतुप्रसारक साधने अशा प्रकारे नष्ट करण्यापूर्वी ती प्रथम निर्धोक करण्यात आली पाहिजे असा आदेश दिला आहे. परंतु अशा साधनांपासून तातडतोब धोका असेल तर मात्र ती त्वरित नष्ट करण्याची परवानगी ठेवण्यात आली आहे. ह्या ठरावाला अमेरिकेच्या संरक्षण खात्याने मान्यता दिली आहे. अमेरिका-इंडोचायनातील युद्धात व्हिएटकाँग सैन्याचा अन्नाचा साठा तोडण्यासाठी भातपिकावर नाशक रसायने फवारीत आहे. तसे करण्यास बंदी करणारा ठराव मात्र नामंजूर करण्यात आला.

---

## प्राप्तीवरील कराची प्रचंड थकबाकी

प्राप्तिकर खात्याने कराची वसुली करण्याचे सर्व प्रयत्न करूनही मार्च १९७० अखेर ५०७·९१ कोटी रुपयांची प्रचंड थकबाकी आहे. त्यापैकी ५६·९४ कोटी रुपयांची थकबाकी १० वर्षांइतकी जुनी आहे व १७०·०८ कोटी रुपयांची थकबाकी दोन ते नऊ वर्षांइतकी जुनी आहे. १९६८-६९ साली एकूण ११०·६ कोटी रुपयांची थकबाकी राहिली तर १९६९-७० सालच्या थकबाकीची रक्कम १३·७ कोटी रुपयांची आहे. भारत सरकारच्या अर्थखात्याने थकबाकीची काही कारणे अशी सांगितली आहेत. प्राप्तिकर खात्याने कराची रक्कम ठरविल्यानंतर आणि तिची मागणी केल्यानंतर करपात्र व्यक्तींनी अगर कंपन्यांनी मागणीविरुद्ध कोर्टात अपिले दाखल केलेली आहेत. काही प्रकरणांत कोर्टांनी, मामला आहे तसाच ठेवण्याचे हुकूम केलेले आहेत. काही करपात्र व्यक्ती भारत सोडून गेलेल्या आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून थकबाकी वसूल करणे अशक्य नाही तरी अवघड होऊन बसले आहे. काही कंपन्या नादारीत गेल्यामुळे त्यांच्याकडील थकबाकी तशीच राहिलेली आहे. सुमारे ९६० करआकारणींची व वसुलीची प्रकरणे मोठी आहेत. ह्या प्रत्येक प्रकरणामुळे ५ लाख रुपये कर थकबाकीत समाविष्ट झालेला आहे. अशा प्रकरणांमुळे सुमारे १·६७ कोटी रुपये थकबाकी साचली आहे. तथापि, खात्याचे प्रयत्न अगदीच अयशस्वी झाले असे म्हणता येत नाही. १९६४-६५ पासूनच्या ७ वर्षांच्या अवधीत खात्याने ५७९·१३ कोटी रुपयांची थकबाकी वसूल केलेली आहे. कर न भरणाऱ्यात डॉ. धर्मा तेजा ह्यांचा समावेश आहे. त्यांच्याकडून २·८० कोटी रुपये कर येणे आहे. मद्रासमधील एका प्रसिद्ध करदात्याकडून १५·६५ लाख रुपये येणे आहे. पण हा करदाता वारला असून त्याची मालमत्ता अपुरी आहे.

---

## अमेरिकन स्त्रियांना काय पाहिजे ?

अमेरिकेत पुरुषांच्या बरोबरीने हक्क मिळविण्यासाठी स्त्रियांची चळवळ सुरू झाली आहे. ह्यासंबंधी स्त्रियांची मने अजमावण्यासाठी ३०० निरनिराळ्या ठिकाणी चाचणी-पाहणी करण्यात आली, त्यात असे आढळून आले की अमेरिकेतील ६५ टक्के स्त्रियांना त्यांच्या जीवनाबद्दल काही विशेष तक्रार करावयाची नाही. ज्या स्त्रियांनी ही चळवळ चालू केली आहे त्यांत बहुसंख्य स्त्रिया कॉलेजचे शिक्षण पुऱ्या केलेल्या आहेत. त्यांची मुख्य तक्रार अशी आहे की अमेरिकेच्या उद्योगधंद्यात वरिष्ठ प्रतीच्या जागांपर्यंत पोचण्याची संधी त्यांना देण्यात येत नाही. ह्या असमाधानी स्त्रिया सोडल्या तर दोनतृतीयांश अमेरिकन महिलांना घरधनीण आणि माता म्हणून राहण्यात समाधान आहे. उद्योगधंद्यात ह्यापुढे तरुण सुशिक्षित स्त्रियांना अधिक संधी मिळण्याची शक्यता आता वाढली आहे.

---

## हॅंडेरसन मेमोरिअल शिष्यवृत्ती मिळविणारे पहिले भारतीय श्री. दीपक वसंत वैद्य

पॉलिमर केमिस्ट्रीच्या उच्च शिक्षणासाठी देण्यात येणाऱ्या 'हॅंडेरसन मेमोरिअल स्कॉलरशिप' साठी चालू वर्षाकरिता इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिंथेटिक रबर प्रोड्यूसर्स ह्या संस्थेने एका भारतीयाची गुणवत्तेवर निवड केली आहे मेक्सिको, बेल्जम, नेदरलंड्स्, ब्राझील आणि भारत ह्यांतील अर्जदारांत त्याला पहिला क्रमांक मिळाला. मुंबईच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचा बी. टेक. पदवीधर, २२ वर्षांचा श्री. दीपक वसंत वैद्य हा तो यशस्वी उमेदवार होय. स्वस्तिक रबर प्रॉडक्टस्, पुणे चे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वसंतराव वैद्य ह्यांचा तो पुत्र असून त्यांनी शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी अमेरिकेतील अॅक्रॉन विद्यापीठात पॉलिमर शास्त्राच्या उच्च पदवीसाठी शिक्षण घेण्याकरिता मुंबईहून विमानमार्गे प्रयाण केले. श्री. दीपक वैद्य हे हॅंडेरसन मेमोरिअल स्कॉलरशिप मिळविणारे पहिलेच भारतीय आहेत. जगातील कृत्रिम रबराच्या एकूण उत्पादन-शक्तीच्या ८०% पेक्षा जास्त उत्पादनशक्ती असलेल्या, १३ देशांतील ३५ कृत्रिम रबराच्या उत्पादकांची इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ही प्रातिनिधिक संस्था आहे. इन्स्टिट्यूटचे संस्थापक दिवंगत बॅंक्रॉफ्ट हॅंडेरसन ह्यांच्या स्मरणार्थ ही शिष्यवृत्ती ठेवलेली आहे.

---

## केरळीय मुलींच्या "विक्री"चे फादर पुथेनपुराचर परिणाम

केरळमधील मुलींची जोगिणी होण्यासाठी "विक्री" केली जाते, अशी माहिती प्रसिद्ध झाली. त्यात कोट्टायमजवळील निर्मल भवन सेक्युलर इन्स्टिट्यूटचे फादर पुथेनपुरा ह्यांचे नाव प्रामुख्याने घेतले जाते. युरोपातील देशांतून त्यांना आलेल्या पैशांचा छडा लावण्यासाठी इन्कमटॅक्स खात्याचे लोक आता त्यांचा पिच्छा पुरवीत आहेत. मध्यवर्ती गुप्त माहिती विभागाचे अधिकारी मुलींच्या पाठवणीविषयी चौकशी करीत आहेत. ठिकठिकाणांहून त्यांना आर्थिक साहाय्य मागणारी पत्रे येत आहेत. ह्या मुली पाठविण्यासाठी खर्च भागवून दोन ते तीन लक्ष रु. उरले, ते निर्मल भवनच्या सुधारणेसाठी खर्च करण्यात आले असल्याने आणि ती धर्मदाय संस्था असल्याने ही रक्कम इन्कमटॅक्सला पात्र होणार नाही, असे फादर पुथेनपुरांचे म्हणणे आहे.

---

## कम्युनिस्ट देशांशी जपानचा वाढता व्यापार

कम्युनिस्ट देशांशी जपानच्या होणाऱ्या व्यापारात झपाट्याने वाढ होत आहे. १९६८ सालातील व्यापाराशी तुलना करता जपानचा रशिआ, चीन व इतर कम्युनिस्ट देश ह्यांच्याशी झालेला व्यापार १३·३ टक्क्यांनी वाढला जपानच्या एकूण परदेशी व्यापारात कम्युनिस्ट देशांशी होणारा व्यापार आता ५·२ टक्के इतका झाला आहे. जपान मुख्यतः यंत्रसामग्री, धातू आणि रसायने ह्यांचा पुरवठा करीत आहे. चीन हे जपानचे मोठे गिऱ्हाईक आहे. चीनमध्ये आर्थिक पुनर्घटना जोराने करण्यात येत आहे. त्याचा फायदा घेऊन जपानने ह्या वर्षी चीनला ३०·८ कोटी डॉलर्सचा माल पुरविला आहे. जपान व रशिया ह्यांमधील व्यापारही वाढत आहे. गेल्या वर्षी जपानने रशियाला २६·८ कोटी डॉलर्स किंमतीचा माल निर्यात केला.

---

## घटस्फोटांमुळे लोकसंख्येत वाढ ?

"ज्या गतीने अन्नपुरवठा वाढतो त्यापेक्षा कितीतरी वाढत्या गतीने लोकसंख्या वाढत जाते. त्यामुळे दारिद्र्य आणि अनवस्था अटळ आहे" असा प्रो. टॉमस रॉबर्ट माल्थस ह्यांनी १५० वर्षांपूर्वी सिद्धांत मांडला. युद्धे, दुष्काळ आणि रोगराई ह्यांची लोकसंख्या आवाक्यात ठेवण्यासाठी आवश्यकताच आहे, असे त्याला प्रथम वाटले परंतु संयमाचा. त्यासाठी उपयोग होईल हे त्याने नंतर कबूल केले. अर्थात, माल्थसला संतती प्रतिबंधक गोळी, भ्रूणहत्येला कायदेशीर स्थान, इत्यादींची कल्पना येणे शक्य नव्हते.

फ्रॅंकलिन डिलॅनो रूझवेल्ट ज्यु (अमेरिकेच्या ३२ व्या अध्यक्षांचा धाकटा मुलगा) ह्याने मिसेस फेलिशिया सारनॉफशी विवाह केला, त्याची बातमी न्यूयॉर्क टाइम्समध्ये प्रसिद्ध झाली आहे. त्या वेळी कोणकोण गैरहजर होते, त्याची यादीच वृत्तपत्राने दिली आहे. नवऱ्या मुलाला आधीच्या पत्नीपासून झालेले दोन मुलगे, दुसऱ्या पत्नीपासून झालेल्या दोन मुली, नवऱ्या मुलीला पहिल्या पतीपासून झालेल्या दोन मुली, ही सर्व विवाह समारंभास आलेली नव्हती. ह्या नव विवाहित दांपत्याला दोन अपत्ये होतील, असे गृहीत धरून चालायला हरकत नाही. म्हणजे, त्यांची एकूण आठ अपत्ये झाली! एकूण पाचजणांनी मिळून ती प्रजा निर्माण केली. प्रत्येक दांपत्याला फक्त दोनच अपत्ये असावीत, असे कुटुंबनियोजन सांगते. ह्या दांपत्याला त्यापेक्षा तीन अपत्ये जास्त आहेत. माजी पती आणि माजी पत्नी प्रत्येक विवाहातून दोन दोन अपत्ये निर्माण करू लागली, तर लोकसंख्या किती तरी वाढत जाईल! फ्रॅंकलिन आणि फेलिशिया हे घटस्फोट घेणार नाहीत कशावरून? त्यामुळे नव्या दोन दांपत्यांना पुनः प्रत्येकी दोन अपत्ये होणार! घटस्फोटांमुळे लोकसंख्या वाढतच जाणार!

---

## प्लॅस्टिक उद्योगाचा अभ्यास व आधुनिक शेतीच्या पाहणीसाठी श्री. प्रसाद तनपुरे सपत्निक परदेशी दौऱ्यावर

राहुरी सहकारी साखरकारखान्याचे विद्यमान चेअरमन आमदार बाबुराव दादा तनपुरे यांचे ज्येष्ठ चिरंजीव व उद्योग-मंत्री ना. राजारामबापू पाटील यांचे जामात श्री. प्रसाद बाबुराव तनपुरे हे सौ. उषाताई तनपुरे यांच्यासह दिनांक ६ सप्टेंबर १९७० रोजी एअर इंडियाच्या विमानाने जपान, अमेरिका व इंग्लंडच्या दौऱ्यावर रवाना झाले आहेत.

---

## परदेशाला जाणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत वाढ

ह्या वर्षाच्या मार्च महिन्यात परदेशी जाऊ इच्छिणाऱ्या प्रवाशांवरील निर्बंध भारत सरकारने सैल केले. त्याचा परिणाम म्हणून एअर इंडिआच्या बोइंग विमानातून सुमारे ६ हजार हिंदी प्रवाशांनी परदेशगमन केले. परदेशी प्रवास करण्याबाबत जे निर्बंध आहेत त्यात प्रवाशांना परदेशी चलनाविषयी भराव्या लागणारा 'पी' फॉर्म हा सर्वात अप्रिय निर्बंध होता. आता हा फॉर्म भरावा लागत नाही आणि तीन वर्षाच्या अवधीत ज्याने परदेशाची सफर केली नसेल त्याला १०० डॉलर्स अथवा रु. ७५० इतके चलन वापरता येते. ह्या निर्बंध सैल झाल्यामुळे प्रवाशांची संख्या वाढली असून एअर इंडिआचे उत्पन्नही वाढले आहे. गेल्या मार्चपासून दरमहा सरासरी १ हजार हिंदी नागरिकांनी परदेशप्रवास केला. जपानमधील ओसाका येथे भरलेल्या एक्स्पो ७० ला भेट देण्यासाठीही प्रवासी गर्दी करू लागले होते. ह्या प्रदर्शनासाठी मार्चपासून जून अखेरपर्यंत सुमारे १,७९२ लोकांनी जपानचा प्रवास केला. त्यातही दिल्लीतून जाणाऱ्या प्रवाशांची संख्या जास्त म्हणजे ७३७ इतकी आहे. मुंबईहून प्रदर्शनाला गेलेल्यांची संख्या ५४५ आहे. त्यानंतर कलकत्त्याचा व मद्रासचा क्रमांक लागतो. कलकत्त्याहून ३६१ आणि मद्रासहून १५० प्रवासी प्रदर्शन पाहण्यास गेले. परदेशी जाणाऱ्या प्रवाशांबाबत एक गोष्ट विशेष लक्षात येते. प्रवास करणारांच्या संख्येत स्त्रिया अधिक प्रमाणात दिसू लागल्या आहेत. उद्योगधंदे व व्यापार ह्यात वावरणाऱ्या श्रीमतांच्या स्त्रियांचाही ह्या संख्येत समावेश आहे.

---

## दफनविधीसाठी लाकडी पेट्या वापरण्यास मनाई

चीनमधील कँटन शहरातील अधिकाऱ्यांनी मृतांना पुरण्यासाठी लाकडी पेट्यांचा वापर करण्यास मनाई करणारा हुकूम काढला आहे. मृतांची शरीरे जाळून टाकण्यात यावीत अगर पेट्यांशिवाय जमिनीत पुरण्यात यावीत अशा सूचना देण्यात आल्या आहेत. लाकूड ही बांधकामात वापरली जाणारी एक महत्त्वाची सामग्री असून तिचा दफनासाठी उपयोग करणे गैर आहे, असे ठरविण्यात आले आहे. मृतांना स्मशानभूमीपर्यंत नेण्यासाठी लाकडी पेट्या पुरविण्यात येणार आहेत. त्यासाठी पेट्यांचा साठाही करण्यात आला आहे. मात्र स्मशानात गेल्यावर शव जमिनीत पुरून पेट्या परत करण्यात आल्या पाहिजेत, असे फर्माविण्यात आले आहे. चीनमध्ये शवांची अग्नीच्या साह्याने विल्हेवाट लावण्यास लोकांचा विरोध आहे आणि तो खोलवर रुजलेला आहे.

---

## अशा शस्त्रक्रिया इष्ट आहेत काय ?

पाश्चात्त्य वैद्यकांत एका बाजूने हरघडी नवनव्या औषधांचा शोध व वापर केला जात आहे. दुसऱ्या बाजूने अतिशय अवघड आणि काही वर्षांपूर्वी केवळ अशक्य गणल्या गेलेल्या शस्त्रक्रियाही कौशल्याने करण्यात येत आहेत. हृदयरोगाने ग्रासलेल्या रोग्याच्या व्याधिग्रस्त हृदयाच्या जागी नवे मानवी हृदय बसविण्याची शस्त्रक्रिया अशाच बिकट शल्यकर्मात मोडते. दक्षिण आफ्रिकेतील डॉ. ब्लेबर्ग ह्यांच्यावर ही शस्त्रक्रिया करण्यात आली त्या वेळी तिच्याबद्दल बरीच प्रसिद्धीही झाली. अशीच शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या इतर रोग्यांपेक्षा डॉ. ब्लेबर्ग अधिक काळ जगले. अर्थातच इतक्या पुरती त्यांच्यावरील शस्त्रक्रिया यशस्वी झाली असे म्हटले पाहिजे. परंतु त्यांच्या मुलीने शस्त्रक्रियेनंतरच्या त्यांच्या जीवनासंबंधी जी माहिती जाहीर केली आहे तीवरून अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया रोग्याच्या दृष्टीने इष्ट आहेत काय असा प्रश्न पडतो. डॉक्टर मजकुरांच्या मुलीच्या माहितीप्रमाणे डॉ. ब्लेबर्ग ह्यांचे शस्त्रक्रियेनंतरचे जीवन अतिशय क्लेशमय होते. त्यांना सर्वकाळ अतिशय वेदना होत होत्या. पण ही गोष्ट जगाला ज्ञात करण्याची त्यांची इच्छा नव्हती. हृदयाचे कलम यशस्वी झाल्यानंतर त्यांना आपले नेहमीचे जीवन कधीच जगता आले नाही. शिवाय त्यांच्या मनोवृत्तीतही विलक्षण बदल घडून आलेला दिसला. त्यांचा स्वभाव फार चिडखोर झाला होता. त्यांची समजूत घालून आवरणे हे फार कठीण काम होऊन बसले. डॉ. ब्लेबर्ग हे शस्त्रक्रिया केल्यानंतर २० महिने तग धरून होते. नंतर त्यांच्या नव्या हृदयाला शरीरात जमवून घेणे जमले नाही.

---

## तळव्याचे कातडे जाड असेल, तर विस्तवावर चालता येते

" विस्तवावरून चालण्याला आध्यात्मिक सामर्थ्याची आवश्यकता नाही; तळव्याचे कातडे जाड असले म्हणजे चालता येते. तीन दशांश सेकंदापेक्षा जास्त वेळ विस्तवावर पाय न राहण्याची दक्षता घेतली म्हणजे झाले." असे कोलंबो विद्यापीठाचे डॉ. फनसेका ह्यांनी दाखवून दिले आहे. विद्यापीठाच्या मेडिकल कॉलेजातील विद्यार्थ्यांकडून त्यांनी यशस्वी रीतीने चालून घेतले आहे.

---

## एक्स्पो '७० प्रदर्शनामुळे जपानचा आर्थिक लाभ

रविवार, दि. १३ रोजी जपानमधील एक्स्पो '७० प्रदर्शन बंद करण्यात आले. सुमारे ६·५ कोटी लोकांनी प्रत्येकी १६·६५ रु. देऊन हे प्रदर्शन पाहिले. प्रदर्शनला सुमारे २०·७५ कोटी रु. नफा झाला. ह्या प्रदर्शनामुळे जपानमधील हॉटेलांना १५६ कोटी रु. चा धंदा मिळाला. परदेशी उतारूंचेकडून १२७ कोटी रु. ची परदेशी हुंडणावळ मिळाली.

---

### आयुर्विमा कॉर्पोरेशनचे गुंतवणुकीचे धोरण

आयुर्विमा कॉर्पोरेशनच्या पैसे गुंतविण्याच्या धोरणात फार मोठा बदल होण्याचा संभव आहे. दिल्ली विभागातील कॉर्पोरेशनच्या नोकरांनी, एजंटांनी व अधिकाऱ्यांनी केलेल्या कामाचा गौरव करण्याचा एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. ह्या समारंभात बोलताना अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण आणि कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. टी. ए. पै ह्यांनी नवीन धोरणाचे 'सूतोवाच' केले. बड्या कंपन्यांना आणि उद्योगपतींनाच फक्त कर्ज देण्याऐवजी समाजातील गरीब वर्गाला मदत करण्याचे धोरण कॉर्पोरेशन स्वीकारील असे दिसते. श्री. चव्हाण ह्यांनी आपल्या भाषणात असे सांगितले, की १४ वर्षांपूर्वी आयुर्विमा कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण झाले. गेल्या वर्षी १४ प्रमुख बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले. परंतु समाजातील पददलितांचा उद्धार करण्यात आला नाही, तर नुसत्या राष्ट्रीयीकरणाचा उपयोग होणार नाही. श्री. पै ह्यांनी आपल्या भाषणात राष्ट्रीय अर्थव्यवस्था मजबूत पायावर उभी करण्यावर भर दिला. ह्या कार्यात आयुर्विमा कॉर्पोरेशनला महत्त्वाचा वाटा उचलता येईल असे सांगून ते म्हणाले, की लोकांपुढील राहत्या घरांचा प्रश्न, पाणीपुरवठ्याचा प्रश्न व इतर मूलभूत गरजा पुरविण्याचे प्रश्न सोडविण्यास कॉर्पोरेशनने मदत केली पाहिजे. कॉर्पोरेशनने जीवनाच्या सुरक्षिततेचे महत्त्व लोकांना पटविण्याच्या कामी बरेच काम केलेले आहे. परंतु ते समाधानकारक म्हणता येणार नाही. ५४ कोटी लोकसंख्या असलेल्या भारतामधील अवघ्या १ कोटी लोकांनीच विमे उतरलेले आहेत. ह्यावरून अजून कितीतरी काम करावयाचे आहे हे दिसून येते. कॉर्पोरेशनशी संबंध असलेल्या सर्वांनीच आपली कामक्षमताही वाढविली पाहिजे.

---

### रशिआ पश्चिम जर्मनीची मदत घेणार

पश्चिम जर्मनीची मदत घेऊन मॉस्कोच्या पूर्वेस ६०० मैलांवर मालवाहू मोटारी तयार करणारा एक प्रचंड कारखाना उभारण्याच्या खटपटीत रशिया आहे. ह्या बाबतीत उभयता देशात लवकरच वाटाघाटी सुरू होणार आहेत. संकल्पित कारखान्याची वार्षिक उत्पादनक्षमता १ लाख, ५० हजार भारी मोटारींची असेल. पश्चिम जर्मनी आणि रशिआ ह्यांनी परस्परात एक अनाक्रमण करार घडवून आणला आहे. त्याच्या पाठोपाठ लवकरच उभयता देशात आर्थिक सहकार्याचा पाया घातला जाईल अशी जाणकारांची अपेक्षा आहे. रशिआत निघू पाहणाऱ्या ह्या कारखान्यासाठी भारतीय चलनात ८०० कोटी रुपये भांडवल लागेल. त्यापैकी निम्मे भांडवल जर्मनीने पुरवावे अशी रशिआची अपेक्षा आहे. हे भांडवल पश्चिम जर्मनीच्या सरकारने पुरवावे की जर्मन बँकांनी पुरवावे हे अद्याप ठरलेले नाही.

---


चवदार पिठासाठी

पिठाच्या चक्क्या

•बॉल बेअरिंग्ज बसविलेल्या

•मजबूत बांधणी

•अद्यावत् यंत्र योजना

•साईज१४", १६", १८"




उत्पादक -

भिडे अँन्ड सन्स प्रा. लि. सांगली

महाराष्ट्र राज्य.

स्थापना १९११

माकडछाप



म्हणजेच

काळी टूथपावडर

नोगी आणि कंपनी प्रा. ली.

मुंबई ६१ ओ. अेस.

सोल सेलींग अेजन्टस्

नोगी सेल्स् कॉर्पोरेशन

१७७ जगन्नाथ शंकरशेठ रोड, मुंबई ४. बी आर.

MARATHI




हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)